**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१**
e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क. : नाविमं / प.उ.मा. / 1558
नागपूर, दि. 21 / 05 / 2025

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
नागपूर विभाग नागपूर.

विषय :–उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा जून / जुलै 2025 च्या पुरवणी परीक्षेचे प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन आवेदनपत्रे व शुल्क भरण्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या सादर करणेबाबत.

संदर्भ :–राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क. / परीक्षा–3 / 1621, दिनांक, 06 / 05 / 2025.

उपरोक्त संदर्भाकिंत विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. 12 वी) परीक्षा जून / जुलै 2025 च्या पुरवणी परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भरलेल्या आवेदनपत्रांच्या यादया (प्रि–लिस्ट) व मंडळाकडे शुल्काचा भरणा केल्याचे चलन इत्यादी साहित्य **सोमवार, दिनांक 26 / 05 / 2025 रोजी सकाळी 11:00 ते 5:00** या वेळेत खालील जिल्हा संकलन केंद्रावर स्विकारण्यात येणार आहे.

तसेच प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रि–लिस्ट सोबत **1. पुर्नपरीक्षार्थी (Rep.) विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकांची छायाप्रत. 2. श्रेणी सुधार (CIS) विद्यार्थ्यांच्या पुर्वी उत्तीर्ण झालेल्या गुणपत्रिकांची छायाप्रत. 3. तुरळक (ISO) विद्यार्थ्यांसाठी पुर्वी उत्तीर्ण झालेली गुणपत्रिकेची छायाप्रत. 4. दिव्यांग (Handicap) विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत. 5. ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer Of Credit घेणारे विद्यार्थी) चे विषय घेऊन प्रविष्ठ झाल्यास ITI उत्तीर्ण झालेल्या गुणपत्रिकेची साक्षांकित छायाप्रत प्रि–लिस्ट सोबत सादर करणे अनिवार्य आहे.**

तरी सर्व प्राचार्यांनी नोंद घ्यावी तसेच आपल्या कनिष्ठ महाविद्यालयांनी उपरोक्त प्रमाणे चलन व प्रि–लिस्ट जमा करण्याकरिता प्रतिनिधी पाठविण्याची कार्यवाही करावी.

| अ.क्र. | संकलन केंद्राची नावे |
|---|---|
| 1. | लालबहादुर शास्त्री कनिष्ठ महाविद्यालय, भंडारा |
| 2. | नंदलाल पाटील कापगते विद्यालय, साकोली |
| 3. | गुजराती नॅशनल क. महाविद्यालय, गोंदिया |
| 4 | हिंदी सिटी क. महाविद्यालय, चंद्रपूर |
| 5. | जनता महाविद्यालय, नागभिड, जि. चंद्रपूर |
| 6. | न्यु. इग्लीश क. महाविद्यालय, वर्धा |
| 7. | शिवाजी हाय. व कनिष्ठ महाविद्यालय, गोकुलनगर, गडचिरोली |
| 8. | धर्मराव विद्यालय, आलापल्ली, जि. गडचिरोली |
| 9. | हितकरणी विद्यालय, आरमोरी, जि. गडचिरोली |
| 10. | नागपूर विभागीय मंडळ, कार्यालय (शहर व ग्रामिण), नागपूर |

सहपत्र : राज्य मंडळ, पुणे यांचे प्रकटन जोडले आहे.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

**प्रतिलिपी :–**

1) मा.शिक्षण उपसंचालक नागपूर, विभाग नागपूर यांना माहितीस्तव सादर.
2) शिक्षणाधिकारी (माध्य). जिल्हा परिषद, (भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया) यांना माहितीस्तव सादर.

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे – ४
## उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) पुरवणी
## जून–जुलै २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) पुरवणी परीक्षेचे आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखांबाबत

### प्रकटन

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) फेब्रु.–मार्च २०२५ परीक्षेचा निकाल दिनांक ०५/०५/२०२५ रोजी ऑनलाईन जाहीर झालेला असून महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे पुरवणी परीक्षा जून–जुलै २०२५ मध्ये घेण्यात येणार आहे. सदर परीक्षेसाठी पुनर्परिक्षार्थी, यापूर्वी नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (फेब्रु.–मार्च २०२५ परीक्षेस प्रविष्ट न झालेले), व जून–जुलै २०२५ परीक्षेसाठी नावनोंदणी केलेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेऊन प्रविष्ट होणारे विद्यार्थी, ITI विषय घेऊन प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत. सदर परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षेचे आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने इयत्ता १२वी साठी www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरावयाची असून त्यांच्या तारखा खालीलप्रमाणे –

| शुल्क प्रकार | विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी RTGS/NEFT द्वारे रक्कम भरावयाची तारीख | उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी RTGS/NEFT पावती/चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रिलिस्ट विभागीय मंडळाकडे जमा करावयाची तारीख |
|---|---|---|---|
| नियमित शुल्क | बुधवार, दिनांक ०७/०५/२०२५ ते शनिवार, दिनांक १७/०५/२०२५ | शुक्रवार दि.२३/०५/२०२५ पर्यंत | सोमवार दि.२६/०५/२०२५ रोजी ऑफलाइन |
| विलंब शुल्क | रविवार, दिनांक १८/०५/२०२५ ते गुरूवार, दिनांक २२/०५/२०२५ | | |

सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरुन SUBMIT केल्यानंतर आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना कॉलेज लॉगिन (College Login) मधून Pre-List उपलब्ध करुन दिलेली असेल, कनिष्ठ महाविद्यालयांनी त्याची प्रिंट काढून आवेदनपत्रात नमूद केलेली सर्व माहिती जनरल रजिस्टरनुसार पडताळून ती अचूक असल्याची खात्री करावी. सदर प्रिलिस्टवर माहितीची खात्री केल्याबाबत संबंधित विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्याचप्रमाणे पडताळणी केलेबाबत उच्च माध्यमिक शाळा प्रमुख/प्राचार्य यांनी प्रिलिस्टच्या प्रत्येक पानावर शिक्क्यासह स्वाक्षरी करावी.

इ. १२ वी परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदपत्रे त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्त्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहेत –

१ ऑनलाईन आवेदनपत्र भरतांना फेब्रु–मार्च २०२५ परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची या परीक्षेतील माहिती आवेदनपत्रात ऑनलाईन घेता येईल.

२ श्रेणीसुधार विद्यार्थ्यांसाठी असलेल्या अटी व शर्तीनुसार श्रेणीसुधार करु इच्छिणाऱ्या फेब्रु.–मार्च २०२५ परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी जून–जुलै २०२५, फेब्रु.–मार्च २०२६ व जून– जुलै २०२६ अशा लगतच्या तीन संधी उपलब्ध राहतील याची नोंद घ्यावी.

३ सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी मंडळाच्या अधिकृत Website द्वारे प्राप्त Online चलनावर नमूद केलेल्या ICICI बँकेच्या Virtual Account मध्ये कोणत्याही बँकेमधून NEFT/ RTGS द्वारे चलनाप्रमाणे अचूक शुल्क रकमेचा भरणा करण्यात यावा.

४ यापूर्वी वापरात असणाऱ्या Bank Of India/ HDFC Bank/Axis Bank च्या जुन्या चलनांचा वापर करण्यात येऊ नये त्याचप्रमाणे मंडळात रोख स्वरूपात शुल्क स्विकारले जाणार नाही.

५ उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी सादर केलेल्या सर्व आवेदनपत्रांचे विहीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय संबंधितांची प्रवेशपत्रे उपलब्ध करून दिली जाणार नाहीत.

६ नियमित व विलंब शुल्काने आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखांमध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

७ अतिविलंब शुल्काने आवेदनपत्रे भरण्याच्या तारखा यथावकाश कळविण्यात येतील.

(देविदास कुलाळ)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे –४

दिनांक – ०६/०५/२०२५

E:\Pardeshi1\Avedanpatra\JulyAug24\HSC.docx15